# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## ऑनलाईन अभ्यासक्रमाचे संकेतस्थळ वार्षिक देखभाल व दुरुस्ती निगराणी दरपत्रके सूचना

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ऑनलाईन अभ्यासक्रमाचे संकेतस्थळाचे वार्षिक निगराणी देखभाल व दुरुस्ती इ. कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्यासाठी दरपत्रके सिलबंद लिफाफ्यातून **मा. वित्त व लेखाअधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांचे नावे **दिनांक २२/०३/२०२४** पर्यंत कार्यालयात पोहोचतील, अशा रितीने पोष्टाने अगर समक्ष आणून द्यावीत. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१. दर देताना ते सर्व करासह (आयकर, जी.एस.टी व इतर सर्व करासहित) साहित्य कार्यालयात पोहोच करून देण्याच्या दरासह देण्यात यावेत.
२. दरपत्रके बिनशर्त असले पाहिजेत.
३. दरपत्रके नोटीस सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार व अटीनुसारच पाठवावे.
४. दरपत्रके सिलंबद लिफाफ्यातून पाठवावे.
५. सदर सिलंबद लिफाफ्यावर जाहिरात/पत्र संदर्भ क्रमांक व दिनांक इ. बाबींचा उल्लेख करावा व त्या लिफाफ्यावर ( **ऑनलाईन अभ्यासक्रमाचे संकेतस्थळ वार्षिक देखभाल व दुरुस्ती निगराणी ची दरपत्रके, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र)** असा स्पष्ट उल्लेख करावा.
६. कोणतेही दरपत्रक अगर सर्व दरपत्रके कारण न देता मंजूर अगर नामंजूर करण्याचा हक्क कार्यालयाने राखून ठेवला आहे.
७. दरपत्रके ही विद्यापीठाच्या आवक विभागात पोस्टाने विहित मुदतीत व कार्यालयीन वेळेत पोहचतील अशी पाठवावी अथवा समक्ष विद्यापीठाच्या आवक विभागात आणून द्यावीत.
८. सदरची कामे ही कामाचा आदेश दिल्यापासून दहा दिवसात अथवा कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करणेची आहेत.
९. दरपत्रक नोटीसमधील कोणत्या बाबीचे कमी अगर जादा कामे करून घेण्याचा किंवा दरपत्रके विभागून मंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
१०. आपणास दिलेल्या कामाच्या आदेशानुसार कामाची पूर्तता झालेनंतर **सॉफ्ट कॉपी**/सोर्स कोड विहित नमुन्यात वर्णन केलेप्रमाणे विद्यापीठाकडे जमा करणेची आहे.
११. आपणास दिलेले काम हे संबंधित फर्म्स/व्यक्ती यांनी करणे बंधनकारक असून सदरचे काम हे त्रयस्थ फर्म्स/व्यक्तींकडे देवू नये.
१२. आपणास दिलेले कामाचा सोर्सकोड हा दरपत्रक कालावधी समाप्त होईपर्यंत जतन करणेचा आहे. तदनंतर सदरची आवश्यक माहिती वेळोवेळी विद्यापीठाकडे जमा करणेची आहे.
१३. आपणास दिलेल्या पुरवठा आदेशानुसार कामाची पूर्तता झालेनंतर आपण सादर केलेल्या एकूण देयकापैकी ९७ टक्के देयक रक्कम देणेत येईल व उर्वरीत राहिलेली ३ टक्के सुरक्षा रक्कम म्हणून जमा करण्यात येईल. सदरची रक्कम ही दरपत्रकाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देणेत येईल.
१४. कामाच्या पुरवठा आदेशापोटी ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही
१५. देयक सादर करताना मा. वित्त व लेखाअधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर_यांचे नावे ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीटसह दोन प्रतीत द्यावे लागेल.
१६. दरपत्रके मान्य झालेनंतर संबंधित फर्म्स/व्यक्तीने रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर कार्यालयाने दिलेल्या विहित नमुन्यात करारपत्र सादर करणे आवश्यक आहे.
१७. उपरोक्तबाबत कोणतीही समस्या उद्‌भवल्यास, त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाचा राहिल.
**१८. दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने म्हणजे तांत्रिक व दराची याप्रकारे द्यावयाचे असून तांत्रिक लिफाफ्यामध्ये पॅन कार्ड, जीएसटी क्रमांक, कामाचे अनुभव प्रमाणपत्र, ग्राहकांची यादी इ. च्या छायांकीत प्रती सोबत जोडणेचे आहे. दराच्या लिफाफ्यामधून फक्त दरपत्रक द्यावयाचे असून ही दोन्ही बंद दरपत्रके एका मोठ्या लखोटयामध्ये मा.उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण, केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या नावे दि.२२/०३/२०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० पर्यंत पाठविण्यात यावे. दरपत्रकाच्या लखोटयावर ऑनलाईन अभ्यासक्रमाचे संकेतस्थळ वार्षिक देखभाल व दुरुस्ती निगराणीची दरपत्रके असे नमुद करावे.**

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**लिफाफा क्र. १ ( तांत्रिक लिफाफा) -** पॅन कार्ड, छायांकीत प्रत, जीएसटी प्रमाणपत्र, ग्राहकांची यादी

**लिफाफा क्र. २ (दराचा लिफाफा) -** दरपत्रक सोबतच्या नमुन्याप्रमाणे

दरपत्रकधारकाचा पत्ता -------------------------
दरपत्रकधारकाचे नाव -------------------------
-------------------------
मोबाईल क्र. ----------------------

**कोटेशन/दरपत्रके धारकांची सही, शिक्का व पूर्ण पत्ता**

सही/-
**उपकुलसचिव**

**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणकेंद्र/६९६**
**दिनांक.१४/०३/२०२४**

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

दिनांक :

प्रति,

मा. वित्त व लेखा अधिकारी
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**संदर्भ :** आपले संदर्भ क्र -------- दि.------------

**विषय : " ऑनलाईन अभ्यासक्रमाचे संकेतस्थळ वार्षिक देखभाल व दुरुस्ती निगराणी ची दरपत्रके, "**

उपरोक्त विषय संदर्भिय पत्रानुसार माझ्या फर्म्सची/व्यक्तीची खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहे

| Sr.No. | Particular | Qty. | Total Cost in Rs. (including all taxes) |
|---|---|---|---|
| 1 | Annual Maintains and Correction Developed of Centre for Distance Education's Online Programme Portal for CDOE As per the requirements of 'Recent Technology' | | |

तसेच उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार कळविलेनुसार मला सर्व नियम व अटी मान्य आहेत.

**कोटेशन/दरपत्रके धारकांची सही, शिक्का व पूर्ण पत्ता**